राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३११३ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| जालीदंर बंडू औटी | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्यादित, राजगुरूनगर उपविभाग राजगुरूनगर | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्यादित, राजगुरूनगर उपविभाग राजगुरूनगर |

**( सुनावणी दिनांक - ३१ / १० /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २२.०५.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती देण्यास टाळाटाळ " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १२.०२.२०२४ | गट न. ४१८ मिरजेवाडी चास, ता. खेड, जि. पुणे, येथे विलास बंडू औटी यांना नवीन जोडणी दिल्यासंदर्भात कार्यवाहीची माहिती. |

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दि. १५.०४.२०२४ रोजी अपिलार्थी यांना १५ दिवसात माहिती पुरविण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांना अद्यापही माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्यादित, राजगुरूनगर उपविभाग यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र “अ” मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी ५० पृष्ठांपर्यंतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थीस ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्यादित, राजगुरूनगर उपविभाग राजगुरूनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र — पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३११३ / २०२४ / पुणे 10186/2025 दिनांक - 20/11/25